**"मे २०१९" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

### (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १५ मे २०१९ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षेतील विषयामध्ये सूट देण्यासंदर्भातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक १५ मे २०१९ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार संवर्गांतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.
- दिनांक २२ मे २०१९ च्या कार्यालयीन आदेशान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील "कार्यासन-१९अ" मधील विषयानुसार सादरीकरणाचे तीन स्तर व अंतिम निर्णयार्थ सक्षम प्राधिकारी निश्चित करण्यात आले आहे.
- दिनांक २३ मे २०१९ च्या शासन निर्णयान्वये भाप्रसे (संवर्ग) नियम, १९५४ मधील ४(२) मधील परंतुकानुसार Apex Scale & Level 17 in the Pay Matrix) या संवर्गात एक पद तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २३ मे २०१९ ते ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत निर्माण करण्यात आले आहे
- राज्य शासनाच्या दिनांक २९ मे २०१९ च्या शासन पत्रान्वये, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या क्रमांक-१/१/२०१९-E-II(B), दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये केंद्रीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २०१९ पासून ३% लागू केलेला वाढीव दराने महागाई भत्ता हा महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागू करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १ जानेवारी २०१९ पासून १२% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.

### (ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- भारतीय प्रशासन सेवेतील ३ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहायक कक्ष अधिकारी-१२९, उच्चश्रेणी लघुलेखक-१३, निम्नश्रेणी लघुलेखक-१६, लिपिक-टंकलेखक-१०१ अशा २५९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका अवर सचिवाला एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आले आहे.
- एका उपसचिवाला सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

### (ग) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील १५ कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर, लिपिक-टंकलेखक संवर्गातील ४४ कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर, निवडश्रेणी लघुलेखक संवर्गातील १ कर्मचाऱ्याला वरिष्ठ स्वीय सहायक पदावर, उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील ५ कर्मचाऱ्यांना निवडश्रेणी लघुलेखक पदावर, निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गातील २० कर्मचाऱ्यांना उच्चश्रेणी लघुलेखक पदावर अशा एकूण ८५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

### (च) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन

- सहसचिव-१, उपसचिव-१, लिपिक टंकलेखक-१ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.

### (छ) प्रशिक्षण / परीक्षा

- दिनांक १७ मे २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा सन २०१९ साठी दिनांक ४ जून २०१९ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.
- दिनांक २० मे २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा सन २०१८ चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.